महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/अनुकंपा/२०२१/ 4330 दिनांक : 29 SEP 2021

प्रति,

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित
संस्था / कार्यालय प्रमुख.

**विषय : अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट अ व गट ब मधील शासकीय कर्मचा-यांना लागू करणेबाबत..**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१२२१/ प्र.क्र.११२/का-८, दिनांक २७/०९/२०२१.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने गट क व ड मधील शासकीय कर्मचा-यांप्रमाणे, अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण गट अ आणि गट ब मधील शासकीय कर्मचा-यांना संदर्भित शासन निर्णयान्वये लागू करण्यात आले असून, त्यानुसार शासकीय सेवेत असताना गट अ व गट ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट क व गट ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय करण्यात आली असून, कोविडच्या पार्श्वभूमीवर सदर योजनेचा लाभ हा दिनांक ०१/०१/२०२० पासून अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. (सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे.)

तरी सदरच्या शासन निर्णयातील तरतूदी आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व संबंधित गट अ व ब मधील दिवंगत अधिका-यांच्या वारसास कळवून त्यानुसार पुढील कार्यवाही करावी.

बरेच संस्था प्रमुख अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना अपूर्ण व अर्धवट प्रस्ताव सादर करतात. त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक अकंपा-१२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१/०९/२०१७ नुसार अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यांचे एकत्रीकरण केलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. तसेच अनुकंपा तत्वावर प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना खाली नमूद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

(०१) पात्र वारसदाराचा त्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसंदर्भातील अर्ज.
(०२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अकंपा-१०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३ आठ, दिनांक २६ ऑक्टोबर, १९९४ प्रमाणे परिशिष्ट-ब, भाग-१ व भाग-२. (सोबत नमुना जोडला आहे) भाग १ व २ मधील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे.
(०३) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची त्याच्याबाबत कार्यालय प्रमुखांची विहीत नमुन्यातील माहिती.(सोबत नमुना जोडला आहे.)
(०४) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे स्टॅम्पवरील मूळ प्रतिज्ञापत्र.

(०५) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे, त्याचे कुटुंबातील व्यक्तींचे स्टॅम्प वरील मूळ संमतीपत्र.
(०६) मागासवर्गीय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचा जातीचा दाखला / जात पडताळणी समितीचा दाखला.
(०७) शैक्षणिक पात्रतेबाबत पुरावा.
(०८) ज्या नातेवाईकाचे जागी अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यावयाची आहे, त्यांचा मयताचा उतारा
(०९) दिवंगत अधिकारी / कर्मचा यांचे पात्र वारसदाराचे नांव नमूद असलेल्या नामनिर्देशनाची सेवा पुस्तकामध्ये घेतलेल्या नोंदीच्या पानाची साक्षांकित प्रत.
(१०) दिवंगत कर्मचा-याचे, तसेच पात्र वारसदाराचे नांव नमूद असलेल्या शिधपत्रिकेची साक्षांकित प्रत

यापुढे असेही कळविण्यात येते की, या कार्यालयाने अनुकंपा प्रस्तावाबाबत वारंवार त्रुटी कळवूनही पुन्हा या कार्यालयास सादर केलेल्या अनुकंपा प्रस्तावांमध्ये ब-याच त्रुटी आढळून येतात. यावरुन असे दिसून येते की, अशा प्रकारचे प्रस्ताव संस्था स्तरावर पडताळणी न करता, आवश्यक ती कागदपत्रे / दाखले इत्यादी प्रस्तावासोबत जोडलेले आहेत किंवा नाही याची शहानिशा न करता अपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास सादर केले जातात. यामुळे या कार्यालयाचा नाहक वेळ वाया जातो.

तरी यापुढे अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना, दिनांक २१/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदींनुसार, तसेच वर नमूद केलेली कागदपत्रे / दाखले / प्रमाणपत्रे इत्यादींच्या मूळ / साक्षांकित प्रतींसह प्रस्ताव अचूक व परिपूर्ण सादर करणेबाबत संबंधितांना सूचित करावे, तसेच असे अपूर्ण व अर्धवट अनुकंपा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यास व त्यामुळे होणा-या विलंबास सर्वस्वी संस्था प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व
गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना
लागू करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन निर्णय क्रमांक : अकंपा -१२२१/प्र.क्र.११२/का-८**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०२१.

वाचा :- शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा -१२१७/प्र.क्र.१०२/का-८,
दि.२१.०९.२०१७

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे अनुकंपा नियुक्ती धोरणातील सर्व तरतूदींचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. प्रचलित अनुकंपा नियुक्ती धोरणानुसार गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मधील पदावर अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्ती देण्यात येते.

अनुकंपा नियुक्तीचे मुख्य प्रयोजन हे, "शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबावर ओढवणाऱ्या आर्थिक आपत्तीतून कुटुंबास बाहेर काढण्यासाठी आणि या आपत्तीजनक परिस्थितीवर मात करण्यास मदत करण्यासाठी संबंधित मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका पात्र सदस्यास शासकीय सेवेत अनुकंपा (सहानुभूती) म्हणून नियुक्ती देणे" असे आहे.

उपरोक्त प्रयोजन तसेच कोविडची पार्श्वभूमी विचारात घेता, गट-क व गट-ड मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच गट-अ व गट-ब मधील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना देखिल ही योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दिनांक २६ ऑगस्ट,२०२१ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

अ) गट-क व ड मधील शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे, अनुकंपा तत्वावर नियुक्तीचे धोरण, गट-अ आणि ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात येत आहे. त्यानुसार शासकीय सेवेत असताना गट-अ व गट-ब मधील दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील पात्र सदस्यास गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय करण्यात येत आहे.

ब) कोविडच्या पार्श्वभूमीवर सदर योजनेचा लाभ हा दिनांक १ जानेवारी,२०२० पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०९२७१६५६०३९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Geeta Rahul Kulkarni

Digitally signed by Geeta Rahul Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=[illegible],
serialNumber=[illegible], cn=Geeta Rahul Kulkarni
Date: 2021.09.27 16:58:42 +05'30'

(गीता कुलकर्णी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, मलबार हिल मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. सर्व सन्माननीय विधान सभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
५. मा. मुख्य सचिव
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व राज्य शासकीय कार्यालयांना संबंधित प्रशासकीय विभागामार्फत)
७. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी,
८. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
९. निवड नस्ती. (कार्यासन-८)

## परिशिष्ट 'ब'

(शासन निर्णय क्रमांक : अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७.)

### शासकीय सेवेत असताना दिवंगत झालेल्या शासकीय कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र. (शासन निर्णय, दि. २६.१०.१९९४)

भाग-१

१. (अ) दिवंगत अधिकारी/कर्मचा-याचे नांव:-
(ब) कर्मचा-याचे पदनाम:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) मृत्यूचा दिनांक/कायमस्वरुपी जायबंदी झाल्याचा दिनांक:-
(इ) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक:-

२. (अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नांव:-
(ब) त्याचे/तिचे कर्मचा-याशी नाते:-
(क) जन्म दिनांक:-
(ड) शैक्षणिक अर्हता:-
(इ) कुटुंबियांपैकी दुस-या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय ?:-

३ स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम.-
(अ) कुटुंब निवृत्तीवेतन-
(ब) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न-
(क) मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदान-
(ड) भविष्यनिर्वाह निधीतील बचत-
(इ) ठेव संलग्न विमा योजना-
(फ) गट विमा योजना-
(ग) आयुर्विम्याची रक्कम-

---

एकूण रक्कम-

४. शासकीय कर्मचा-याच्या कुटुंबातील सर्व व्यक्तींचा तपशील (त्यापैकी कोणी नोकरी/व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन याबाबतची माहिती)

| अ.क्र. (१) | नांव (२) | शासकीय कर्मचा-याशी नाते व वय (३) | नोकरी /व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न (४) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजुतीप्रमाणे ख-या आहेत. वरील बाबींपैकी एक बाब जरी भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर माझी नियुक्ती समाप्त करण्यात यावी.

दिनांक- उमेदवाराची सही.

श्री./श्रीमती ........................................................ हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी नमूद केलेल्या बाबी ख-या आहेत.

दिनांक:- स्थायी शासकीय कर्मचा-याची सही व पत्ता

भाग-२

१ (अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नांव:-

(ब) त्याचे/तिचे शासकीय अधिकारी/कर्मचा-याशी नाते:-

(क) शैक्षणिक अर्हता, वय (जन्मतारीख), अनुभव (काही असल्यास):-

(ड) ज्या पदावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व कार्यालयाचे नांव:-

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक:-

३. विभाग प्रमुख/विभागाची शिफारस:-

४. उमेदवाराचे प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्यांचा खुलासा:-

मी उमेदवाराने नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी तपासल्या आहेत.

दिनांक- आस्थापना अधिका यांची सही,

ठिकाण- गांव व पत्ता

## तक्ता अ (वर्ग ३ व वर्ग ४ करिता स्वतंत्र तक्ता)

शासकीय सेवेत असताना दिवंगत / अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकांस अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेसाठी प्रतिक्षा यादीवर नांवे घेणेसाठी पात्र उमेदवारांची माहिती दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | दिवंगत/ वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांचे नांव | जन्म तारीख | मृत्यू/अकाली रुग्णता सेवानिवृत्तीचा दिनांक | कर्मचारी जर रुग्णता सेवानिवृत्त झाला असल्यास त्यांचे सेवानिवृत्तीचे दिवशी वय | अर्जदाराचे नांव | कर्मचा-याशी नाते | अर्जाचा दिनांक | जन्म दिनांक | शिक्षण | मराठी/ इंग्रजी टंकलेखन | जात | शासनाचे निर्णयानुसार पात्र असलेबाबत अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | | | | | | |

वरील माहिती मूळ कागदपत्रांवरुन तपासून घेतली असून ती बरोबर असल्याची खात्री केली आहे. माहिती चुकीची आढळून आल्यास त्यास सर्वस्वी हे कार्यालय जबाबदार राहील.

सही/-
संस्था प्रमुखांचे नांव
पदनाम